**Yashwantrao Chavan Maharashtra Open University, Nashik**
**यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक**
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan, Nashik-422 222
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन, नाशिक - 422 222
Ph.- 0253-2231714-15, Fax- 2231716, E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac

जावक क्र. परीक्षा/डिसेंबर 2017/ दिनांक 19.09.2017

**पुर्नपरीक्षार्थी विदयार्थ्यांसाठी - परीक्षा अर्ज भरण्याबाबतच्या महत्त्वाच्या**

१) यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध शिक्षणक्रमाच्या सत्रनिहाय व पुरवणी परीक्षा डिसेंबर 2017 मध्ये आयोजित करण्यात येत आहेत. सर्व शिक्षणक्रमांच्या परीक्षेचे वेळापत्रक हे विद्यापीठाच्या संकेतस्थळावर नोव्हेंबर 2017 च्या तिसऱ्या आठवड्यात उपलब्ध होईल.

२) 16 अंकी कायम नोंदणी क्रमांक असलेल्या सर्व पुर्नपरीक्षार्थींनी संबंधित शिक्षणक्रमांच्या परीक्षेसाठी ऑनलाईन परीक्षा अर्ज **दिनांक 25 सप्टेंबर 2017 ते 23 ऑक्टोबर 2017** या कालावधीत भरावयाचा आहे. यानंतर मुदतवाढ तसेच विलंब शुल्क राहणार नाही

३) सर्व शिक्षणक्रमांच्या पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांना लेखी/प्रात्यक्षिक परीक्षेसाठी रू.500/- परीक्षा शुल्क आकारण्यात आले आहे. एक किंवा त्यापेक्षा अधिक अभ्यासक्रम (विषय) असले तरीही प्रत्येक पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी म्हणून एकरकमी रू.500/- परीक्षा शुल्क भरावे लागेल. यात अभ्यासक्रमाची (विषयाची) अट असणार नाही. ऑनलाईन परीक्षा अर्ज भरतांना Debit Card / Credit Card/ Net Banking इत्यादी मार्फत परीक्षा शुल्क भरता येईल.

४) **बी.ए./बी.कॉम.च्या ज्या विद्यार्थ्यांनी सन 2008 पूर्वी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा नोंदणी कालावधी संपलेला आहे.** तसेच इतर शिक्षणक्रमांच्या विद्यार्थ्यांचा नोंदणीचा विहित कालावधी संपलेला असेल अशा नियमांच्या अधिन राहून अशा विद्यार्थ्यांनी प्रथम पुर्ननोंदणी केल्यानंतरच ऑनलाईन परीक्षा अर्ज भरावा पुर्ननोंदणी न करता परीक्षा अर्ज भरल्यास अशा विद्यार्थ्यांना परीक्षेस पात्र धरले जाणार नाही.

**५) 9 अंकी कायम नोंदणी क्रमांक विद्यार्थ्यांचा नोंदणी कालावधी संपुष्टात आलेला असल्यामुळे या विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरता येणार नाही. याची संबंधित विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

६) नियमित व पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थी संख्येचा विचार करून व विद्यापीठाने निश्चित केलेल्या परीक्षा केंद्रावर परीक्षा देणे बंधनकारक राहील परीक्षाकेंद्रांची यादी नोंव्हेंबर 2017 च्या तिसऱ्या आठवड्यात विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध होईल.

७) परीक्षेस पात्र विद्यार्थ्यांना परीक्षा प्रवेश-पत्र (हॉलतिकिट) कसे डाऊनलोड करावे याच्या सूचना संकेतस्थळावर नोव्हेंबर 2017 च्या तिसऱ्या आठवडयात उपलब्ध होतील. हॉलतिकिटाशिवाय कुठल्याही परिस्थितीत विद्यार्थ्याला परीक्षा देता येणार नाही. अपात्र विद्यार्थ्यांनी परीक्षेचा अर्ज भरू नये व परीक्षेलाही बसू नये.

**८) परीक्षेला येतांना स्वतःचे हॉलतिकिट व ओळखपत्र बरोबर आणावे अन्यथा परीक्षेला बसता येणार नाही.**

९) परीक्षा चालू असतांना विद्यार्थ्यांनी संबंधित अभ्यासक्रमाचे अध्ययन साहित्य, कागदपत्रे, मोबाईल अथवा कॉपी बरोबर आणू नये. परीक्षेत कॉपी करतांना आढळल्यास अथवा उत्तरपुस्तिका तपासतांना कॉपी केल्याचे परीक्षकांना आढळल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१०) प्रत्येक विद्यार्थ्याने परीक्षेच्या अद्यावत माहितीसाठी विद्यापीठाचे अधिकृत संकेतस्थळ वेळोवेळी पहावे

**सर्व परीक्षार्थी, अभ्यासकेंद्र आणि विभागीय केंद्र यांनी वरील सूचनांची नोंद घ्यावी**

**परीक्षा नियंत्रक**

**प्रत -1)** विभागीय संचालक, य.च.म.मु.वि. सर्व विभागीय केंद्र
2) उपकुलसचिव, परीक्ष-2,3, सहा.कुलसचिव, परीक्षा -1
3) प्रमुख, संगणक कक्ष
4) प्रमुख, एम.के.सी.एल.